POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२८२ ● मुंबई, शुक्रवार, १५ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

खरातवरील कारवाईनंतर दीड महिन्यात 26 भोंदूबाबांवर गुन्हे दाखल; हे हिमनगाचं टोक, अंनिसचा दावा



नाशिक येथील भोंदू अशोक खरात याला अटक होऊन आता दोन महिने पूर्ण होत आले आहेत. त्याच्यावर दाखल असलेल्या 9 गुन्ह्यांपैकी दोन प्रकरणांत पोलिसांनी आरोपपत्र (चार्जशीट) दाखल केले आहे. उर्वरित गुन्ह्यांचे दोषारोपपत्रही लवकरच सादर केले जाणार आहे. खरातने महिलांना विविध प्रकारे धमकावून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे धक्कादायक वास्तव या आरोपपत्रातून समोर आले आहे. या प्रकरणाने राज्यभरात मोठी जनजागृती झाली असून, आता अनेक पीडित लोक समोर येऊन पोलिसांकडे दाद मागत आहेत. शिक्षण पद्धतीत बदलाची गरज अंनिस गेल्या 25 वर्षांपासून वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसारासाठी प्रयत्न करत आहे. डॉ. दाभोलकर यांच्या मते, नवीन शैक्षणिक धोरणात शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक मनोभाव निर्माण करण्यासाठी शासनाने विशेष पुढाकार घेणे आवश्यक आहे. जेव्हा लोक विचार करायला लागतात, तेव्हाच ते भोंदूंच्या तावडीत सापडत नाही. दुर्दैवाने, विचार करणारे नागरिक अनेकदा राज्यकर्त्यांना नको असतात, म्हणूनच शालेय शिक्षणात वैज्ञानिक दृष्टीकोनाचा आग्रह राज्यकर्ते धरत नाही. त्यामुळे या विषयावर लोकांचा रेटा निर्माण होण्याची गरज आहे. सावधानता बाळगण्याचे आवाहन आपण बाजारात किराणा माल घेतानाही त्याची चौकशी करतो, मग स्वतःच्या आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घेताना किंवा संकटाच्या वेळी कोणाकडे मदत मागतोय, याची चौकशी का करत नाही? असा रोकडा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. नागरिकांच्या मदतीसाठी अंनिसने स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने हेल्पलाईन सुरू केली आहे. भोंदू बाबाकडून फसवल्या गेलेल्या लोकांनी या 9922048832 आणि 8087876809 हेल्पलाईन नंबरचा वापर करावा असे आवाहन डॉ. हमीद दाभोलकर यांनी केले. तसेच अशोक खरात आणि सोलापूरचा मनोहर मामा यांसारख्या प्रकरणांमुळे कायद्याचे यश दिसत असले, तरी समाजातील अंधश्रद्धेचे मूळ उपटून टाकण्यासाठी लोकसहभाग आणि वैचारिक क्रांतीची गरज आहे, असे डॉ. दाभोलकर म्हणाले.

दीड महिन्यात 26 भोंदूबाबांवर गुन्हे दाखल
अशोक कुमार खरात , नाशिक
गडगेबाबा (राजेंद्र गडगे) , संगमनेर , अहिल्यानगर
चेतन सुनील माळी (मूर्तिजापूर, अकोला)
पंकज देवराम घोलप, (येडगांव, पुणे)
मोहन मामा भोसले, (कुरूडवाडी, सोलापूर)
नाना बर्डे , (आळे फाटा , पुणे)
ऋषिकेश वैद्य (वसई .मुंबई)
अल्ताफ रईस खान (मालाड, मुंबई)
रिधम पांचाळ (मालाड, मुंबई)
गणेश शिंदे (श्रीरामपुर, अहिल्यानगर)
अर्जुन चव्हाण उर्फ टनटन बाबा , नवी मुंबई
विठोबा वाल्मीक जाट, सातपूर, नाशिक
किसन तळपे मंदोशी, खेड
महेशगिरी (महेश काकडे) निफाड,नाशिक
अब्दुल रशीद शेख, खालापूर, रायगड
इरफान नियाज अहमद , कांदिवली , मुंबई
अनिल सोलोमन सिंग (पादरी) , पुणे
शिवराम पराश सावर, पालघर
अल्ताफ हसन मदारी, जळगाव
नाना महाराज उर्फ गुरु माऊली वीरकर, टेंभुर्णी . सोलापूर
पिंटू धुमाळ बारामती, पुणे
हेमदास किसन बावणे,अड्याळ,भंडारा
चंद्रकांत राजेंद्र माळी , इगतपुरी, नाशिक
अशोक मधुकर आढाव, श्रीरामपूर,अहिल्यानगर
औदुंबर दरवाडे , स्वारगेट, पुणे
रवींद्र एरंडे, सातपूर, नाशिक

मेट्रो शहरांमध्ये भोंदूगिरीचा सुळसुळाट

मुंबई, पुणे आणि नाशिक यांसारख्या ह्यमेट्रो सिटीजह्णमध्ये सर्वाधिक भोंदू सापडले आहेत. राज्यात लागू करण्यात आलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यामुळे हे गुन्हे दाखल होऊ शकले आहेत. मेट्रो शहरात 15 हून अधिक भोंदू सापडणे ही अत्यंत चिंताजनक बाब असल्याचे डॉ. दाभोलकर यांनी नमूद केले. ह्यशहरांमध्ये शिकलेली लोकं जास्त असूनही त्यांच्यामध्ये चिकित्सक दृष्टीचा अभाव दिसतो. शाळा-महाविद्यालयांमध्ये आपण ज्ञान देतो, पण चिकित्सक विचार करायला शिकवत नाही. दैवीशक्ती नावाची कोणतीही गोष्ट जगात नसते, हे समजून घेणे काळाची गरज आहे,ह्व असे त्यांनी सांगितले.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबई : राज्यात गेल्या काही दिवसांपासून भोंदूगिरीविरोधातील मोहिमेने वेग घेतला आहे. नाशिकचा कथित भोंदू बाबा अशोक खरात याच्या अटकेनंतर महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली असून, अवघ्या दीड महिन्यात राज्यात तब्बल 26 भोंदूबाबांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, यापैकी 15 गुन्हे हे मुंबई, पुणे आणि नाशिक यांसारख्या विकसित शहरांमध्ये दाखल झाले आहेत. हे प्रमाण म्हणजे केवळ ह्यहिमनगाचे टोकह्ण असून राज्यात अजूनही अनेक भोंदूंचे बस्तान असल्याचे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे (अनिस) डॉ. हमीद दाभोलकर यांनी स्पष्ट केले. अशोक खरात प्रकरणातील धक्कादायक खुलासे

'NEET' पेपरफुटीवर संतापले राज ठाकरे

विजय थलपतींचं नाव घेतलं, उत्तर-दक्षिण गणितंही मांडलं, नेमकं काय म्हणाले?

■मुंबई । प्रतिनिधी,

देशभरात नीट परीक्षेच्या (NEET) पेपरफुटीवरुन गोंधळ सुरू असून एनटीएने परीक्षा रद्द केल्याने पालक आणि विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त होत आहे. दुसरीकडे सीबीआयने पेपरफुटीप्रकरणात जोमाने कारवाईला सुरुवात केली असून महाराष्ट्रातील पुणे, अहिल्यानगर आणि नाशिकमधून आत्तापर्यंत 5 जणांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे. विरोधकांनी या मुद्द्यावरुन सरकारला लक्ष्य केलं असून तामिळनाडूचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री सी. विजय थपलती यांनी तर नीट परीक्षाच घ्यायला नको, अशी भूमिका स्पष्ट केली आहे.



आता, विजय यांच्या भूमिकेला मनसेप्रमुख राज ठाकरेंनी पाठिंबा दिला असून माज्यासारखाच दक्षिणेतील नेत्यांनी देखील NEET परीक्षेला विरोध केला असून ही परीक्षाच रद्द करा असे सूचवल्याचे राज ठाकरेंनी म्हटले. राज ठाकरेंनी आज ट्विटरवरुन नीट परीक्षेसंदर्भात महत्त्वाची आणि संतापजनक प्रतिक्रिया दिली. तसेच, परीक्षेचे दक्षिण-उत्तर असे गणितही त्यांनी समजावून सांगितलं आहे. दरम्यान, मुख्यमंत्री विजय यांनीही या परीक्षेला विरोध कर नीट परीक्षाच रद्द करण्याची मागणी केली होती, त्यावरूनही राज यांनी भाष्य केलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ईव्ही गाडीचा वापर सुरू, ताफ्यातील वाहनेही केली कमी

■ठाणे। प्रतिनिधी,

कोविड काळात देशातील जनतेने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आणि त्यामुळे भारत सुरक्षितपणे कोविड संकटातून बाहेर पडला. आता देशासमोर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीतही नागरिकांनी राष्ट्रहित डोळ्यासमोर ठेवून केंद्र सरकारच्या आवाहनाला प्रतिसाद द्यावा, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ते ठाणे ते पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचतीचे आवाहन केल्यानंतर त्याची मोदींनी आजपासून अंमलबजावणी सुरू केली. तर त्यांच्या आवाहनाला तत्काळ प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही ईव्ही गाडी



वापरण्याचा निर्णय घेतला आहे. आज आपल्या निवासस्थानाहून सह्याद्री अतिथीगृहात जाण्यासाठी त्यांनी ईव्ही गाडीचा वापर केला. त्यासोबतच आपल्या ताफ्यातील वाहने देखील कमी केली असल्याचे त्यांनी सांगितले. यात आपल्याला सुरक्षा देणाऱ्या सुरक्षा रक्षकांची वाहने सोडल्यास अन्य वाहने सोबत ठेवणार नसल्याचे त्यांनी जाहीर केले. यावेळी बोलताना शिंदे म्हणाले की, प्रधानमंत्री मोदी यांनी देशात काटकसरीचे नियोजन करण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करून इंधन बचतीवर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. भारत मोठ्या प्रमाणावर क्रूड ऑईल आयात करतो, त्यामुळे त्यावरील खर्च कमी करण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाने इंधनाचा संयमित वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी त्यांनी पश्चिम बंगाल आणि आसाममधील निवडणूक निकालांचा उल्लेख करत त्यांनी मोदी यांच्या नेतृत्वावर जनतेचा विश्वास असल्याचे सांगितले. तसेच काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावरही त्यांनी टीका केली. देशातील जनता सुज्ञ आहे. हे पब्लिक है, सब जानती है, त्यामुळे विरोधकांनी या विषयात राजकारण न करता राष्ट्रहितासाठी सरकारच्या आवाहनाला साथ द्यावी, असे आवाहन शिंदे यांनी केले.

मध्य रेल्वेचा सलग तीन दिवस ब्लॉक; अनेक लोकल रद्द!

■मुंबई । प्रतिनिधी,

रेल्वे प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाची बातमी. मध्य रेल्वेकडून उद्यापासून सलग तीन दिवस रात्रकालीन विशेष ब्लॉक घेण्यात येणार असून, याचा फटका हजारो प्रवाशांना बसणार आहे. विद्याविहार स्थानकातील मध्यवर्ती पादचारी पुलाच्या (एफओबी) गर्डर बसवण्याच्या कामासाठी १५ मे ते १८ मेदरम्यान विशेष वाहतूक आणि वीजपुरवठा ब्लॉक जाहीर करण्यात आला आहे. या ब्लॉकमुळे कुर्ला ते भांडुपदरम्यान अनेक लोकल सेवांमध्ये बदल करण्यात आले असून काही लोकल फेऱ्या रद्द देखील करण्यात येणार आहेत. ब्लॉकच्या वेळापत्रकानुसार, शुक्रवारी मध्यरात्री १.१५ ते पहाटे ४.१५ वाजेपर्यंत, शनिवारी रात्री १२.१० ते पहाटे ४.४० वाजेपर्यंत



आणि रविवारी मध्यरात्री १.१५ ते पहाटे ३.०५ वाजेपर्यंत विशेष ब्लॉक राहणार आहे. या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथून रात्री ११.३० ते १२.१२ दरम्यान कर्जतच्या दिशेने जाणाऱ्या धिम्या लोकल गाड्या माटुंगा ते मुलुंड स्थानकांदरम्यान जलद मार्गावर वळवण्यात येणार आहेत. तसेच कसाऱ्याहून रात्री १० वाजल्यापासून सीएसएमटीच्या दिशेने येणाऱ्या लोकल गाड्यांनाही मुलुंड ते माटुंगा स्थानकांदरम्यान जलद मार्गावरून चालवण्यात येणार आहे. याशिवाय सीएसएमटीहून सुटणाऱ्या काही लोकल गाड्यांचा प्रवास कुर्ला येथेच संपवण्यात येणार असून, अप दिशेने येणाऱ्या काही गाड्या ठाणे येथेच थांबवण्यात येतील. मध्य रेल्वेकडून हे गर्डर लाँचिंगचे काम तीन टप्प्यांत पार पडणार आहे.

विद्याविहार स्थानकातील इंटरमीडिएट फूटओव्हर ब्रिजच्या कामासाठी शुक्रवारपासून सलग तीन रात्री विशेष वाहतूक आणि पॉवर ब्लॉक घेतला जाणार आहे. त्यामुळे रात्री उशिरा प्रवास करणाऱ्या नोकरदार आणि प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. तीन दिवसांच्या या ब्लॉकमुळे मध्य रेल्वेची लोकल सेवा विस्कळीत होण्याची शक्यता असून, आधीच उशिराने धावणाऱ्या गाड्यांमुळे प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. त्यात आता सलग तीन दिवस ब्लॉक घेतला जाणार असल्याने प्रवाशांचे हाल आणखी वाढणार आहेत. विशेषतः रात्री उशिरा कामावरून घरी परतणाऱ्या नोकरदारांना मोठा त्रास सहन करावा लागू शकतो. दरम्यान, ब्लॉकच्या काळात काही लोकल गाड्या पूर्णपणे रद्द करण्यात येणार आहेत. ठाणे येथून रात्री ११.४० वाजता सुटणारी ठाणे-कुर्ला लोकल तसेच पहाटे ४.०४ वाजता सुटणारी ठाणे-सीएसएमटी लोकल रद्द राहणार आहे. तसेच सीएसएमटीहून रात्री ११.३८ आणि १२.२४ वाजता सुटणाऱ्या सीएसएमटी-ठाणे लोकल गाड्याही रद्द करण्यात येणार असल्याची माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली आहे.

लाखो मुंबईकरांच्या घरात येतेय दूषित पाणी; वर्षभरात २,६८७ तक्रारी, सर्वाधिक दूषित पाणी ई व टी विभागात

■मुंबई । प्रतिनिधी,

स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठा पालिकेचा हा दावा फोल ठरला आहे. मार्च २०२६ ते मार्च २०२६ या वर्षभरात दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तब्बल २,६८७ तक्रारी मुंबई महापालिकेच्या जल विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. सर्वाधिक ई विभागात ३९० तर टी विभागात ३६१ तक्रारी प्राप्त झाल्या. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या जुन्या व जीर्ण झाल्या आहेत. मुंबईत सीसी रस्त्यांची कामे, विविध प्राधिकरणाची कामे सुरु असून खोदकामा दरम्यान जलवाहिनीला फटका बसतो आणि जलवाहिनीला गळती लागते. जमिनीखालून जलवाहिनी फुटल्याने मलनिस्सारण वाहिन्यांचे



पाणी अनेकदा जलवाहिनीत जाते आणि मुंबईकरांना दूषित पाणीपुरवठा होतो, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. शहर, पूर्व उपनगरे आणि पश्चिम उपनगरांत मिळून वर्षभरात तब्बल २,६८७ तक्रारी प्राप्त झाल्या असून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरु आहे. अनेक भागांत गढूळ, दुर्गंधीयुक्त आणि दूषित पाणीपुरवठ्याबाबत वारंवार तक्रारी होत असतानाही प्रशासनाकडून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत ठोस उपाययोजना करण्यात येत नाहीत, असा आरोप नगरसेवकांनी केला आहे. गोकुळधाममध्ये २५ दिवसांपासून त्रास गोरेगाव पूर्व येथील गोकूळधाम आरएमएस २२ वसाहती असून वसाहत व परिसरात गेल्या २५ दिवसांपासून गढूळ पाण्याचा पुरवठा होत आहे. याबाबत वारंवार जलअभियंता विभागाच्या अधिकाऱ्यांनाही सांगूनही काम होत नसल्याने थेट दुषित पाण्याची बॉटल्सच स्थायी समितीमध्ये दाखवून हे पाणी आपण पिऊ शकाल का सवाल भाजपच्या नगरसेविका प्रीती सातम यांनी प्रशासनाला केला. प्रभाकर शिंदे यांनी प्रशासनाला इतर नगरसेवकांच्या प्रभागातही अशाप्रकारच्या समस्या असतील जलअभियंता विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने निवारण करण्याचा प्रयत्न करावा, अशा सूचना केल्या.

दूषित पाण्याच्या तक्रारी

एकूण तक्रारी : २,६८७

सर्वाधिक तक्रारी : ई विभाग - ३९०

सर्वाधिक तक्रारी : ई विभाग - ३९०

दुसऱ्या क्रमांकावर : टी विभाग - ३६१

पश्चिम उपनगरात सर्वाधिक : के/प - २४०

मिरा-भाईंदरमध्ये आरटीई प्रवेश प्रक्रियेत घोटाळा,धक्कादायक माहिती समोर

■भाईंदर। प्रतिनिधी,

शिक्षणाचा हक्क कायद्याअंतर्गत ई (आरटीई) खासगी शाळांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर करण्याचा धक्कादायक प्रकार मिरा-भाईंदर शहरात उघडकीस आला आहे. महापालिकेच्या शिक्षण विभागाने केलेल्या पडताळणीत २९ उत्पन्नाचे बनावट दाखले सादर केल्याचे निष्पन्न झाले आहे. बनावट दाखले सादर करणारे बहुतांश पालक मिरारोड पूर्वेच्या नयानगर भागातील आहेत. मिरारोड येथील एका ठराविक सेतू सुविधा केंद्रावरून किंवा व्यक्तींकडून हे दाखले बनवण्यात आल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आरटीई प्रवेशासाठी उत्पन्नाचा दाखला अनिवार्य असल्याने, पालकांनी एजंटांना २५०० ते ३००० रुपये मोजून हे बोगस दाखले मिळवले होते.

मात्र, आता या फसवणुकीमुळे पालकांचे पैसे तर गेलेच, पण मुलांचा प्रवेशही नाकारला गेला आहे. काही दाखल्यांवरील माहिती ऑनलाईन उपलब्ध नव्हती, बारकोड स्कॅन



होत नसल्याने आम्ही महसूल विभागाकडे पडताळणीसाठी पाठवले असता हे दाखले बोगस असल्याचे उघडकीस आले असल्याची माहिती महापालिका शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत नायब तहसीलदार प्रथमेश बुरके यांनी नयानगर पोलीस ठाण्याला पत्र दिले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी महसूल विभागाने केली आहे. हे सर्व दाखले एकाच ठिकाणाहून तयार झाले असावेत, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. प्रवेशाची मुदत संपल्याने आणि सादर केलेले दाखले अवैध ठरल्याने या २९ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य आता टांगणीला लागले आहे. आरटीई अंतर्गत मोफत प्रवेश मिळणार नसल्याने, आता पालकांना जास्त फी भरून खासगी शाळांमध्ये प्रवेश घ्यावा लागणार आहे.

नेमकं प्रकरण काय?

1) मिरा-भाईंदरमधील ३७ खासगी शाळांमधील २९८ राखीव जागांसाठी ऑनलाइन पद्धतीने ६७६ अर्ज आले होते.

2) निवड झालेल्या २९८ अर्जांच्या कागदपत्रांची पडताळणी करताना शिक्षण विभागाला तीन दाखल्यांवरील बारकोड स्कॅन होत नसल्याचे आढळले.

3) संशय बळावल्याने सर्व अर्जांची तपासणी केली असता, तब्बल २९ दाखले बोगस असल्याचे समोर आले.

4) काही दाखल्यांवर मिरा-भाईंदरमध्ये कार्यरत नसलेल्या तहसीलदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत, तर काही दाखल्यांवर नायब तहसीलदारांच्या बनावट सह्या आढळल्या आहेत.

5) मूळ दाखला दुसऱ्या व्यक्तीचा असून त्यावर एडिट करून पालकांनी स्वतःची नावे टाकल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.

मिरा- भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये यासाठी पालकांना नवीन उत्पन्नाचा दाखला काढण्यासाठी वेळ द्यावा. तसेच सदरील कृत्य करून विद्यार्थ्यांची व पालकांची फसवणूक करणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करून कारवाई करावी. मात्र विद्यार्थी यांचे नुकसान होऊ नये याचाही विचार करावा.


- जय ठाकूर, गटनेता, मिरा भाईंदर विकास आघाडी



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

वर्तमानाचेही भान हवे!



तिसऱ्या आणि चौथ्या मुंबईचा येत्या काही वर्षांत विकास होणार आहे. तिसऱ्या मुंबईच्या विसकासाचे दृष्टीने तर महत्त्वाचे पावलेही उचलली जात आहेत. पण या दरम्यान, सध्याच्या शहराकडे दुर्लक्ष होत आहे का? सध्याच्या मुंबईचा श्वास कोंडत असल्यामुळेच तिसऱ्या आणि चौथ्या मुंबईचा वेगाने विकास करण्यासाठी महाराष्ट्र सरकार धडपड करत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच केले. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या व्यासपीठावर दिलेल्या मुलाखतीमध्ये फडणवीस यांनी पनवेल - उलवे - उरण या परिसरामध्ये तिसरी मुंबई वेगाने वसत असल्याचे सांगतानाच वाढवणजवळ विकसित होत असलेल्या बंदराच्या निमित्ताने चौथी मुंबई विकसित केली जाणार असल्याचेही सांगितले. सत्तरच्या दशकामध्ये नवी मुंबई विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू केल्यामुळे आज मुंबईचा विकास होऊ शकला, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. कोणी कितीही नाकारण्याचे प्रयत्न केले तरी गेले शतकभर मुंबई हीच देशाची आर्थिक राजधानी राहिलेली आहे, पुढील शतकभरही राहील. साहजिकच रोजगाराच्या निमित्ताने आणि प्रगतीच्या आसेने येत्या काळामध्ये हजारो नागरिक दर वर्षी या शहरामध्ये येऊन आपले स्थान निर्माण करण्यासाठी धडपड करणार. किमान हे भान ठेवून येणाऱ्या या लोकांना सामावून घेण्याचा आणि त्यांना किमान नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा विचार राज्य सरकार करत आहे, असेच मुख्यमंत्र्यांच्या प्रतिपादनातून स्पष्ट होते. अर्थात याचे स्वागतच करायला हवे. पण हे होत असतानाच सध्याच्या मुंबईकडेही अधिक लक्ष देण्याची गरज आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये मुंबईमध्ये काही किमान मूलभूत सुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. रस्ते, उड्डाणपूल, कोस्टल रोड, मेट्रो यांसारखे प्रकल्प मार्गी लागत असले तरीही त्याचा वेग अजूनही वाढविण्याची गरज आहे. दक्षिण मुंबई आणि मध्य मुंबईमध्ये या सुविधा निर्माण होत असल्या तरीही उपनगरांमधले प्रश्न याच काळामध्ये जटील होताना दिसतात. विशेष करून मुंबई - ठाणे- कल्याण - कर्जत या लोहमार्गाच्या परिसरातील उपनगरांकडे गेल्या अनेक वर्षांत कोणीच लक्ष दिले नसल्याचे सातत्याने जाणवत राहते. मुंबईमध्ये अनेक उड्डाणपूल बांधले जात असताना ठाणे - कल्याण व कर्जत परिसरामध्ये मुंबईहून जाण्यासाठी चांगला रस्ता का नसावा, याचे उत्तर अजून एकाही राज्यकर्त्याने देण्याचे कष्ट घेतलेले नाहीत. या परिसरातील लोकप्रतिनिधींनाही त्याचे काही वाटत नाही. शीळ फाट्यावरची वाहतूक कोंडी दिवसाच्या चोवीस तासांत कधीही होऊ शकते याबद्दल सगळ्यांमध्येच एकमत असते; पण ती किंवा या रस्त्यावर इतर ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी फुटावी यासाठी प्रयत्न होताना दिसत नाहीत. या परिसरामध्ये मेट्रोचे काम सुरू असले तरीही ते कधी पूर्ण होईल हे अजूनही नजरेत येत नाही. ठाण्याच्या घोडबंदर रस्त्यावरील नागरिकांना तर संयमाचे दररोज बक्षीस देण्याची गरज आहे. राष्ट्रीय महामार्ग असलेल्या या रस्त्याकडे जितक्या अनास्थेने बघितले जात आहे तितके देशातील इतर कोणत्याही रस्त्याकडे बघितले जात नसावे. लक्षावधी नागरिकांची दररोज होणारी गैरसोय हीच सोय असल्याच्या थाटात प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कसे राहू शकतात, हाच प्रश्न आहे. बदलापूर, अंबरनाथ, कळवा यासारख्या उपनगरांमधील नागरी सुविधांची स्थिती त्याहून भीषण आहे. नुसत्या नगरपालिका किंवा महानगरपालिका स्थापन करून प्रश्न सुटत नाहीत. मुख्य मुंबईला जोडण्यासाठी असलेली लोकल रेल्वे सेवाही दिवसेंदिवस बेभरवशाची होत असल्याने या परिसरातील नागरिकांची अवस्था 'आई जेवू घालेना....' अशी झाली आहे. पश्चिम उपनगरातील नागरिकांची स्थिती काहीशी बरी असली तरीही तेथेही सुधारणेला भरपूर वाव आहेच. गेल्या पंचवीस तीस वर्षांमध्ये बोरीवलीनंतर पश्चिम उपनगरांमध्ये झालेली वाढ ही वाढ नसून दिवसेंदिवस सूज बनते आहे. मुंबईमध्ये वाहतुकीखालोखाल आरोग्य, स्वच्छता, पिण्याचे पाणी, शिक्षण या सगळ्याच सुविधांचा दर्जा दिवसेंदिवस वेगाने घसरतो आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये दाखल झालेल्या रुग्णांना उंदीर घेत असलेले चावे आणि मुंबईच्या उपनगरांमध्ये असलेल्या नाले व छोट्या नद्यांमधून वाहणारे सांडपाणी, त्यामुळे येणाऱ्या साथी याची दखल तर आता माध्यमांनीही घेणे सोडून दिले आहे. पिण्याच्या पाण्याची स्थितीही दिवसेंदिवस गंभीर होते आहे. या आठवड्यातच मुंबईत दहा टक्के पाणी कपात लागू होते आहे. पुढील दोन महिने तरी ती कायम राहील. पावसाने वेळेवर हजेरी लावली नाही तर मुंबईकरांच्या तोंडचे पाणी पळण्याचीच चिन्हे आहेत. त्यामुळे तिसऱ्या व चौथ्या मुंबईने सध्याच्या मुंबईचा श्वास मोकळा होण्याची आशा व्यक्त केली तरीही त्याच्या मयार्दा लक्षात घेण्याची गरज आहे. त्याचबरोबर सध्याची मुंबई व्हेंटिलेटरवर जाण्याअगोदर तिचे आरोग्य सांभाळण्यासाठी तातडीने पावले टाकण्याची गरज आहे.

पावसाच्या तोंडावर जाग कशी येते?



पावसाळा दीड-दोन महिन्यांवर आला की दरवर्षी नालेसफाई आणि धोकादायक इमारतींचा प्रश्न प्रामुख्याने चचेर्ला येतो. आपल्याला लोकांची किती काळजी आहे, हे सांगत नालेसफाईची कामे दिली जातात, नेहमीप्रमाणे पाहणी दौरे होतात आणि त्यानंतर रिवाजाप्रमाणे पावसाळ्यात नालेसफाईचा फज्जा उडालेला दिसतो. अगदी वषार्नुवर्षे हे असेच सुरू आहे. धोकादायक इमारतींबाबतही असेच घडत आहे.

पावसाळ्यापूर्वी महिनाभर आधी धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींची यादी जाहीर केली जाते, त्यांना घरे रिकामी करण्याच्या नोटिसा बजावल्या जातात. या सर्व प्रक्रिया जणूकाही रिवाज-परंपरा म्हणून सुरू आहे. त्यामुळेच धोकादायक इमारतींबाबत सरकारचे ठोस धोरण आहे का, असा प्रश्न पडतो. कारण धोकादायक किंवा अतिधोकादायक इमारत पाडणे एवढ्यापुरताच हा प्रश्न नसतो. तत्पूर्वी त्या इमारतींमधील रहिवाशांच्या दुर्सया निर्वायाचा प्रश्न सुटणे महत्त्वाचे असते. तसेच त्यांची मुले शाळेत जात असतील तर त्यांना शाळेचे अंतर पाहावे लागते. मात्र, बहुतांश वेळा नोटीस बजावली की आपली जबाबदारी संपली असे समजून संबंधित महापालिका किंवा म्हाडासारख्या संस्था हात झटकायला मोकळ्या होतात.

त्यातून अतिधोकादायक इमारती कोसळून जीवितहानी होते, लोक रस्त्यावर येतात. शिवाय त्यांची मोठ्या प्रमाणात वित्तीय हानी होते, कागदपत्रे गहाळ होतात. पोटापाण्यासाठी लोक आपली गावे सोडून शहराच्या ठिकाणी येतात. नव्या इमारतींमध्ये जागा घेणे त्यांना परवडत नाही. त्यामुळे कमी किमतीत जागा भाड्याने मिळत असेल तर ती घेतात. अशी जागा त्यांना जुन्या इमारतींमध्ये मिळते. इतकेच नव्हे तर अशा जुन्या इमारतींमध्ये ज्येष्ठ नागरिक राहत असतात. त्यांची मुले विदेशात असतात. अशा वेळी ते राहत असलेली इमारत धोकादायक आहे, म्हणून त्यांना रिकामी केली जाण्यास सांगितले तर ते जाणार कुठे? धोकादायक इमारती आणि अनधिकृत झोपडपट्टया यांची सरकारी आस्थापनांना पावसाच्या तोंडावरच जाग कशी येते. त्या अगोदर वर्षभर ही मंडळी काय करत असतात? कारण पावसाळा सुरू असताना डोक्यावरचे असलेले छप्पर सोडून माणसे बाहेर कशी जाणार, याचा सरकारने विचार करावा.

आताही मुंबईसह महामुंबई परिसरातील नऊ महापालिकांमधील आढावा घेतला तर 20 हजार 600 हून अधिक इमारती धोकादायक आहेत. म्हणजे किमान 22 ते 25 लाख लोकांच्या जीवन-मरणाचा हा प्रश्न आहे. म्हणूनच याकडे खूप गांभीयार्ने पाहण्याची गरज आहे. एकट्या मुंबईत 13 हजारांहून अधिक तर ठाणे महापालिका हद्दीत साडेचार हजार धोकादायक इमारती आहेत. यावरून लगतच्या दोन्ही शहरांमध्ये छोटा हादरा बसला तरी धोकादायक इमारतींचे काय होईल, याची नुसती कल्पना केलेली बरी. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये विरार पूर्वेच्या नारिंगी परिसरातील रमाबाई अपार्टमेंट ही चार मजली इमारत कोसळली होती. यात 17 लोकांचा जीव गेला होता. तत्पूर्वी जुलै 2020 मध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससमोरील भानुशाली इमारत कोसळून 9 रहिवाशांचा बळी गेला होता.

घाटकोपरमध्ये जुलै 2017 मध्ये साईदर्शन इमारत कोसळून 17 जणांचा मृत्यू झाला होता. अगदी गेल्या वर्षी कल्याण पूर्वेतील चिकणीपाडा भागात धोकादायक इमारतीच्या चौथ्या मजल्याचा स्लॅब कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला होता. अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत. वर नमूद केलेल्या काही ठळक घटना सांगण्याचे कारण म्हणजे धोकादायक इमारत जाहीर केली म्हणजे आपली जबाबदारी संपली, असे महापालिका किंवा सरकार मानते. वास्तविक 30 वर्षे जुन्या तसेच जीर्ण असलेल्या इमारतींना तर 3 वर्षांनी आणि 15 ते 30 वर्षे जुन्या इमारतींना दर 5 वर्षांनी स्ट्रक्चरल ऑडिट करणे सरकारने बंधनकारक केले आहे. मात्र, हे स्ट्रक्चरल ऑडिट खरोखरच केले जाते का, हे पाहणारी सक्षम यंत्रणा नाही. त्यामुळे धोकादायक इमारतींची आकडेवारी गोळा होत असली तरी त्यातील रहिवाशांचे जीव कसे वाचणार, हा प्रश्न आहेच. यासाठी प्रभावी उपाययोजना केली जात नाही.

इमारत अतिधोकादायक असली तर ती पाडावीच लागते तसेच ज्या इमारती धोकादायक असून सी2ए वर्गश्रेणीत असतात त्या इमारती रिकाम्या करून त्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करावी लागते. अशावेळी रहिवाशांना पयार्यी जागा मिळवावी लागते किंवा तशी जागा उपलब्ध करून द्यावी लागते. नेमके हेच होत नसल्यामुळे आणि इमारतीची दुरुस्ती वेळेत होईल, याची खात्री नसल्यामुळे धोकादायक इमारतींमधील लोक पटकन घरे रिकामी करण्यास तयार नसतात, हे वास्तव आहे. कारण सरकारी बाबू केवळ कागदी घोडे नाचवण्यात माहीर असतात. तरीही कागदपत्रे म्हणजे फाईली पटापट पुढे सरकत नाहीत, हा सर्वांचाच अनुभव आहे. शिवाय धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीचे काम वेळेत पूर्ण होईल, याची खात्री तिथले अधिकारीही देऊ शकत नाहीत. अनेकदा कंत्राटदार काम अर्धवट सोडतात किंवा दुरुस्तीचा कालावधी काही कारणांमुळे वाढतो.

बहुतेकवेळा रहिवाशांना पयार्यी जागा देता येत नाही ही महापालिकांची अडचण असते तसेच असलेल्या ठिकाणाहून लांब जाण्यास धोकादायक इमारतींमधील लोक तयार नसतात, अशा अनेक अडचणी आहेत. मात्र, ही मंडळी रोज जीव मुठीत घेऊन धोकादायक इमारतींमध्ये राहात असतात, यावरून घर धोकादायक असले तरी सर्वसामान्यांसाठी डोक्यावरील छप्पर किती महत्त्वाचे आहे, हे सरकारने जाणून घ्यायला हवे. धोकादायक इमारती

स्वतः त्याग केला तरच त्याला अर्थ आहे



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला काटकसरीचे आवाहन केल्यानंतर उलटसुलट प्रतिक्रिया विविध माध्यमांतून उमटत आहेत. सोने खरेदीला फाटा, पेट्रोल डिझेलचा कमी वापर, याचा परिणाम अखेर महागाई आणि बेरोजगारी वाढण्यात होणार असा एकूण सूर आहे. सरकार जेव्हा आर्थिक संकटातून जात असते तेव्हा जनतेला काटकसरीचे आवाहन केले जाते. रुपयाची आंतराष्ट्रीय बाजारात काय किंमत आहे हे सर्वांना ठाऊक आहे आणि बाहेर व्यवहार अमेरिकन डॉलर्समधून होत असल्याने भारताला ते जड जातेय. गेले दोन महिने होर्मुझची सामुद्रधुनी बंद आहे. कितीही नाही म्हटले तरी याचा परिणाम तेल व नैसर्गिक वायू पुरवठा यावर झालाच आहे. शिवाय भारतीय वस्तूंच्या नियार्तीवरही झाला आहे. एकूण काय तर परकीय चलनाद्वारे कमीत कमी खरेदी व्हावी व देशाच्या गरजा मर्यादित ठेवाव्या हा त्याचा अर्थ. बचत करा म्हणजेच टंचाईला तोंड द्या. शासकीय भाषेत दुष्काळाला टंचाई हा शब्द आहे. पाण्याची टंचाई, अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली की हा शब्द वापरला जातो. वेगळ्या मागनि जनतेला सामील करून घेत सर्व गोष्टींचे रेशनींग सुरू होणे याचाच दुसरा अर्थ टंचाई परिस्थितीला सामोरे जाणे असा होतो. काटकसरीचे आवाहन फक्त सामान्य जनता व शेतकरी वगार्लाच का, असा एक सवाल प्रामुख्याने केला जात आहे. आज शेतकरी अडचणीत आहे व तो वेगवेगळ्या समस्यांचा सामना करत आहे. उत्पादन खर्चही निघत नाही तेव्हा नफ्याचे गणित जुळता जुळत नाही. शेतीला उत्तम जोडधंदा म्हणून ओळखला जाणारा दुधाचा व्यवसाय अडचणीत आहे. शेतकरीवर्गाच्या मते दुधाचा उत्पादनखर्च लिटरमागे ५० रुपये असताना बाजारात ३६ ते ४१ रुपये दर मिळतो. परवा एका कांदा उत्पादक शेतकऱ्याला अवघ्या एक रुपया किलो दराने कांदे विकावे लागल्याचे वृत्त आले. शेतकरीवर्गाने रासायनिक खतांचा वापर कमी करावा अशी अपेक्षा पंतप्रधान व्यक्त करतात. पण सेंद्रीय खत वापर, सौरऊर्जा निर्मिती याला फारसे पोषक वातावरण व प्रोत्साहन दिसत नाही. सेंद्रीय खतांसाठी फारसे काही करताना दिसत रासायनिक खतांसाठी अनुदान देणारे केंद्र सरकार नाही. सेंद्रीय उत्पादने वाढवणे ही काळाची गरज असतानाही त्यासाठी अनुकूल वातावरण निर्मिती नाही. देशी तेलबिया उत्पादन वाढावे व त्याला उत्तम भाव मिळावा अशी अपेक्षा असताना विदेशातून तेल आयातीवर नियंत्रण न आणता आता परकीय चलन वाचवण्यासाठी याचा वापरच कमी करा असे आवाहन केल्याने लोक बुचकळ्यात पडले आहेत हे वास्तव आहे.

देशापुढे अडचणी येतात तेव्हा पोटाला चिमटा घेऊन कनिष्ट मध्यमवर्ग व शेतकरीच ढाल बनतो. त्याच्या तक्रारी व गाऱ्हाण्यांना आवाज नसतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर कमी होते तेव्हा सर्वसामान्यांना दिलासा मिळाला नव्हता. कार्पोरेट टॅक्समध्ये कपात केली गेली तेव्हा वेगळीच भाषा होती. देशापुढे अडचणी आल्या की मध्यमवर्ग, शेतकरी, बेरोजगार, गृहिणी यांनाच त्याची तोशीस सहन करावी लागते. जेव्हा बँकांची काही लाख कोटींची थकित कर्जे निर्लेखित केली जातात, कार्पोरेट टॅक्समध्ये कपात केली जाते तेव्हा हाच वर्ग आपण यात कुठे आहोत का, हे शोधत असल्याची भाषा विविध प्रतिक्रियांमधून ऐकायला मिळत आहे. बचतीचे मार्ग म्हणून सार्वजनिक वाहतुकीचा वापर, मोठे लग्न समारंभ, परदेश दौरे याबाबत सल्ले दिले जात आहेत. समजा सर्व उपाययोजना केल्या तरी देशाची उत्पादकता वाढून ट्रिलीयन डॉलर, पाच ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्थेची स्वप्ने ठरलेल्या मुदतीत साकार होणार आहेत ? विकसीत भारत २०४७ चे स्वप्न साकार करण्याची जबाबदारी नेमकी कोणाची आहे, हा प्रश्न निर्माण होणार आहे. दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी एक वेळचे जेवण बंद करण्याचे आवाहन केले तेव्हा देशभर त्याची चर्चा झाली. त्यांनी स्वतः आठवड्यात एक-एक दिवस गहू आणि तांदूळ याचे पदार्थ जेवणात टाळले. तेव्हा देश अन्नधान्य उत्पादनात स्वंयपूर्ण व्हायचा होता. १९७२ च्या दुष्काळाने महाराष्ट्राला खूप काही शिकविले. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी हरितक्रांतीची हाक तेव्हाच दिली. वि. स. पागे यांच्या कल्पनेतून रोजगार हमी योजनेला तेव्हाच आकार आला. लोकांनी त्याला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. देशाचे चलन केवळ गरिबांच्या त्यागावर वाचवले जाऊ शकत नाही. काटकसर केवळ त्यांच्या सहभागावर अवलंबून नसते. देशात १९७२ साली 'महाराष्ट्र अतिथी नियंत्रण आदेश' लागू करताना हीच संकल्पना होती. त्या आदेशानुसार लग्न व अंत्यसंस्कारपश्चात आयोजित कार्यक्रमात ४०० पेक्षा जास्त लोकांना जेवण देण्यास मज्जाव करण्यात आला होता. या दोन प्रसंगांशिवाय इतर कार्यक्रमात १०० पेक्षा अधिक लोकांना जेवण देण्यास बंदी होती. या आदेशात केवळ यजमान नव्हे तर जेवण बनवणारे केटरर्स, जिथे जेवणावळी आयोजित केल्या जातात अशी हॉटेल्स यांच्यावरही बंधन आणले गेले होते. त्यावेळी तांदळाची टंचाई असल्याने याचे एकापेक्षा अधिक पदार्थ बनविण्यावरही बंधन आणले गेले होते. जिथे प्रसाद म्हणून पदार्थ तयार केले जातात त्यांना एका व्यक्तीसाठी ४० ग्रॅमपेक्षा अधिक वजन असलेले जिन्नस बनवता येत नव्हते. या आदेशाची कठोर अंमलबजावणी करण्याचे सर्वाधिकार शिधावाटप नियंत्रक व जिल्हाधिकारी यांना देण्यात आले होते. आज देशात भलेही अन्नधान्याची टंचाई नसेल, पण परकीय चलन वाचविण्यासाठी कठोर उपाययोजना करताना त्या केवळ विशिष्ट वगार्साठी असता कामा नयेत. पेट्रोल, डिझेलचा वापर मर्यादित असावा यासाठी पंतप्रधानांनी स्वतःच्या वाहन ताफ्यात कपात केली असे वृत्त आले आहे. राज्यातही त्याची कसोशीन अंमलबजावणी व्हायला हवी. मागे पंतप्रधानांनी लाल दिवा संस्कृती बंद केली तेव्हा त्याची राज्यातही अंमलबजावणी सुरू झाली. पण समोर आणि मागे पोलिसांची लाल-पिवळा दिवा असलेली वाहने ठेवली जातात. ते दिवेही सुरू असतात आणि त्या गाड्यांचे सायरनही सुरू असतात. त्याचा अर्थ सामान्यांना कळत नाही असे समजण्याचे कारण नाही. सरकारी व्यवस्थेत मोठ्या पदांवरील लोकांकडे एकापेक्षा अनेक गाड्या तैनात ठेवल्या जातात. त्यातील काही तर ऐनवेळी पै-पाहुणे, कटुंबातील इतर सदस्यांना लागतात म्हणून असतात. एखाद्या विभागाच्या अतंर्गत एकापेक्षा अधिक शासकीय उपक्रम असतील तर प्रत्येक उपक्रमाचे एक वाहन वरिष्ठांच्या दिमतीसाठी तयार ठेवले जाते. अशी सर्व वाहने काढून घेऊन लोकांपुढे आदर्श ठेवता आला पाहिजे. हल्ली मंत्री व विधिमंडळ सदस्यांना फक्त सुरक्षा रक्षकच नाही तर मागे-पुढे वाहनेही लागतात. एखाद्याला खरेच याची गरज आहे का हे न पाहताही सत्ताधारी बाजूच्या बहुतेक सर्वांना 'वाय' दजार्ची सुरक्षाव्यवस्था पुरविण्यात येत आहे. त्यासाठी एकापेक्षा अधिक वाहने लागतात. याचाही फेरविचार पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनानुसार झाला पाहिजे. मंत्री व राज्यमंत्री यांच्या कार्यालयात किती कर्मचारी असावेत याचे नियम आहेत. पण चर्चा अशी असते की त्यापेक्षा किती तरी अधिक लोक तिथे कार्यरत असतात. त्यांच्या दिमतीलाही वाहने असतात.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

ई-निविदा सुचना क्र. ४० सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, मजीप्राजव्य विभाग, अंबरनाथ यांच्याकडून अंबरनाथ विभाग कार्यालय तसेच अंतर्गत उपविभाग अंबरनाथ व बदलापूर येथील कार्यालयीन कामाकरीता आवश्यक मनुष्यबळ पुरविणेच्या कामाची ई-निविदा मागविण्यात येत आहे.

कामाची अंदाजित किंमत **रु.२८,५७,३३२/- (रुपये अठ्ठावीस लाख सत्तावन्न हजार तीनशे बत्तीस मात्र)** इतकी आहे. (१२ महिन्यांकरीता)

सदर निविदेचा सविस्तर तपशिल **दि.१५/०५/२०२६** पासून **www.mahatenders.gov.in.** व **www.mjp.maharashtra.gov.in** या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

ठिकाणी :- अंबरनाथ
दिनांक :- ११/०५/२०२६

सही/-
कार्यकारी अभियंता,
मजीप्राजव्य विभाग अंबरनाथ

क्रमांक : आरओसी - 2026-27/क्र-5/सी792

दररोज पोहे खाणे आरोग्यासाठी चांगलं की वाईट?



महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाचा सकाळचा नाश्ता म्हणजे पोहे. चवीबरोबर आरोग्यासाठी फायदेशीर असणारे पोहे आवडीने खाल्ले जातात. आयर्न आणि काबोर्हायड्रेट्सचा उत्तम स्रोत असलेले पोहे हा एक पारंपारिक आणि पौष्टिक नाश्ता मानला जातो. पण, तुम्ही कधी विचार केला आहे का की, दररोज पोहे खाणे तुमच्या आरोग्यासाठी नक्की फायदेशीर आहे की नुकसानकारक? जाणून घेऊयात पोहे खाल्ल्यानंतर शरीरावर काय परिणाम होतो?

पोहे खाण्याचे फायदे

पोहे प्रोबायोटिक असल्याने आतड्यांच्या आरोग्यासाठी चांगले मानले जातात.

शरीराला उर्जा देण्यासाठी आवश्यक असलेले काबोर्हायड्रेट्स पोह्यात असतात. सकाळी नाश्त्यात पोहे खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते.

पोह्यामध्ये कमी कॅलरीज असतात आणि त्यातील फायबरमुळे पोट बराच वेळ भरलेले राहते, ज्यामुळे अति खाणे टाळले जाते.

पोह्यामध्ये फॅट कमी असते आणि मॅग्नेशियम असते, जे हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी आणि रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.कांदा, शेंगदाणे आणि कढीपत्ता घालून बनवलेले पोहे प्रथिने, व्हिटॅमिन्स आणि अँटीऑक्सिडंट्सचा चांगला स्त्रोत आहेत.

पण आरोग्यतज्ज्ञांच्या मते पोहे पचायला हलके असले तरी मधुमेह असलेल्या रुग्णांनी ते मर्यादित प्रमाणात खावेत. तसेच पोहे जास्त प्रमाणात खाल्ल्यास पोट जड होते. त्यामुळे काही गोष्टी पोहे खाताना लक्षात ठेवाव्यात.

पोहे खाताना काय काळजी घ्यावी?

पोहे अधिक पौष्टिक करण्यासाठी त्यात शेंगदाणे, मटार, गाजर, कांदा आणि कढीपत्ता यासारख्या भाज्या वापराव्यात. यामुळे प्रोटिनही मिळतील. जर तुम्ही वेटलॉस करत असाल तर पोहे बनवताना तेलाचा वापर कमी करावा.काहींना पोहे खाताना वरून साखर मिक्स करण्याची सवय असते, जी दररोज खाणे आरोग्यासाठी योग्य नाही. त्यामुळे हे टाळावे. थोडक्यात सांगायचे झाल्यास तर तुम्ही जर भरपूर भाज्या घालून आणि कमी तेलात बनवलेले पोहे खात असाल, तर ते रोज खाणे नक्कीच आरोग्यासाठी फायदेशीर आहे. मात्र, पोटाचा त्रास असणारे, मधुमेह रूग्णांनी दररोज पोहे खाणे टाळावे. पोह्यासोबत नाश्तात उपमा, मूग डाळ धिरडे, घावणे यांचाही समावेश करावा.

धोंड्याचा महिना आणि जावयाचा मानपान; काय आहे यामागील कारण?

अधिक मास २०२६
अधिक मासात जावयाचा मानपान करण्यामागील कारण
दर तीन वर्षांनी अधिक मासाचा महिना येतो. ज्याला ह्यपुरुषोत्तममह्न मास किंवा ह्यमल मासह्न असे देखील म्हणतात. यंदा 17 मे पासून अधिक मासाला सुरूवात होत आहे. या काळात शुभ कार्ये किंवा समारंभ करण्यात मनाई असते. परंतू, या महिन्यात जावयाचा विशेष मान सन्मान केला जातो. जावयाला घरी जेवायला बोलावून त्यांना वाण दिले जाते, त्याचे आदरातिथ्य केलं जातं. पण याच महिन्यात जावयाचा मान-सन्मान का? काय आहे यामागचे धार्मिक महत्त्व जाणून घेऊयात सविस्तरपणे,
जावयाचा सन्मान का?
अधिकमास हा महिना भगवान विष्णू यांना समर्पित केलेला आहे. त्यामुळे या महिन्यात भगवान विष्णूंची पूजा केली जाते. आपला जावई हा साक्षात विष्णू आणि आपली लेक म्हणजे लक्ष्मी देवीचे स्वरूप मानून या महिन्यात त्यांना घरी



जेवण्यास आमंत्रण दिले जाते. जेवायला बोलावून त्यांना मेजवानी दिले जाते, जावयाचा सन्मान केला जाते. आपल्या मुलीचा संसार सुखाचा व्हावा या भावनेतून जावयाला विष्णूचे रूप मानून त्याचे पूजन केलं जाते. याशिवाय या महिन्यात दानाला विशेष महत्त्व असते. कन्यादान केल्यानंतर जावई हा कुटुंबाचा एक महत्त्वाचा भाग होतो. जावयाला दिलेले दान हे प्रत्यक्ष विष्णूला अर्पण केल्यासारखे मानले जाते. त्यामुळे अधिक मासात जावयाचा मान करण्याची प्रथा आहे.
वाणात काय द्यावे?
जावयाला वाण देताना त्याला पाटावर बसण्यास सांगावे. यानंतर कुंकू लावून ओवाळावे. वाण देण्यासाठी चांदीचे ताट किंवा निरंजन देण्याची पद्धत आहे. मात्र आजचे सोने चांदीचे भाव बघता तुम्ही ऐपतीप्रमाणे त्यांचा मान-सन्मान करू शकता. लेकीचीही साडीचोळीने ओटी भरावी. आपल्या मुलीला सासरच्या वातारणात प्रेमाने सांभाळून घेणारा जावई हा मुलीच्या आईवडिलांसाठी नारायणासमान असतो. त्यामुळे या मासात जावयाचा मान करण्याची प्रथा आहे. ही प्रथा फार पूर्वीपासून चालत आली असून आजही जपली जाते.

रेसिपी

ओटमिल कूकिज

'ओटमिल कूकिज'साठी लागणारा साहीत्य:

- दिड कप मैदा
- १/२ टेस्पून बेकिंग पावडर
- १ टिस्पून बेकिंग सोडा
- १ बटर स्टिक, मऊसर (१/२ कप)
- १ + १/४ कप ब्राऊन शुगर
- एग रिप्लेसर पावडर, २ अंड्यासाठी
- १ टिस्पून वॅनीला
- दिड कप ओट्स
- १ कप चॉकोलेट चिप्स किंवा चंक्स

'ओटमिल कूकिज'ची कृती:

- ओव्हन ३५० फ्र(१७५ उ) वर प्रिहीट करावे
- ओव्हन गरम होतय तोवर मध्यम भांड्यात मैदा, बेकिंग पावडर आणि बेकिंग सोडा चाळून घ्यावा.
- एका मोठ्या खोलगट भांड्यात बटर आणि ब्राऊन शुगर हलके होईस्तोवर फेसावे. एग रिप्लेसर पावडरमध्ये पाकिटावर लिहिलेल्या प्रमाणात पाणी घालून मिक्स करावे. हे मिश्रण घालून बटर+साखर फेटावे. त्यात मैदा घालून मिक्स करावे.
- आता ओट्स घालून हातानेच मिक्स करावे. चॉकोलेट चिप्स घालून व्यवस्थित मिक्स करावे.
- मिश्रण, ग्रिस केलेल्या बेकिंग ट्रेमध्ये आईसक्रिम स्कूपने एक-दोन इंचाच्या अंतरावर ठेवावे. नंतर स्कूप केलेले मिश्रणाचे गोळे हाताने दाब देऊन चपटे करावे. ओव्हनमध्ये मधल्या रॅकवर ट्रे ठेवून १६ ते १८ मिनीटे बेक करावे.
- बेक झाल्यावर ट्रे बाहेर काढून कूकिज गार होवू द्याव्यात.

टीप: कूकिमध्ये चॉकोलेट चिप्स बरोबर बेदाणे किंवा ड्राईड क्रॅनबेरीज घालू शकतो.

- बेकिंगसाठी लागणारा वेळ ओव्हनच्या हिटींग पॉवरवर तसेच कूकिजच्या आकारावर अवलंबून आहे. त्यामुळे जर कूकिजचा शेप लहान असेल तर बेकिंगसाठी १४ मिनीटे पुरेशी होतील.
- एग रिप्लेसर पावडरऐवजी २ मध्यम अंडी घालू शकतो.



बोधकथा

भगवान बुद्ध आणि चक्षुपाल

एकदा भगवान बुद्ध जेतवन विहारात रहात होते, भिक्षुक चक्षुपाल त्यांना भेटावयास आले. त्यांच्या आल्यामुळे त्यांच्या स्वभावाची दैनंदिनीची आणि गुणांची चर्चा सुरु झाली. भिक्षुक चक्षुपाल हे आंधळे होते. एके दिवशी विहारातील काही इतर भिक्षुकांना चक्षुपालाच्या झोपडीच्या बाहेर काही मेलेले कीटक आढळले. त्यांनी चक्षुपालाची निंदा-नालस्ती करायला सुरुवात केली की चक्षुपालाने प्राण्यांना ठार मारले. भगवान बुद्धांनी निंदा-नालस्ती करणाऱ्या त्या भिक्षुकांनां बोलविले आणि विचारले की आपण चक्षुपालला हे जीव मारतांना बघितले आहेस का? त्यांनी उत्तर नाही बघितले असे दिले. या वर भगवान म्हणाले की ज्या प्रकारे आपण चक्षुपालला कीटक मारताना बघितले नाही त्याच प्रकारे चक्षुपालाने हे कीटक देखील बघितले नाही. म्हणून त्यांची निंदा करणे योग्य नाही. भिक्षुकांनी भगवान बुद्ध यांना विचारले की चक्षुपाल हे आंधळे का आहे? त्यांनी या जन्मी किंवा गतजन्मी अशी कोणती पापे केली आहे. भगवान बुद्धांनी चक्षुपाल बद्दल सांगितले की गतजन्मी ते एक चिकित्सक होते. एका आंधळ्या स्त्री ने त्यांना वचन दिले होते की जर ते तिचे डोळे बरे करतील तर ती आणि तिचे कुटुंब त्यांचे गुलाम होतील. त्या अंध स्त्रीचे डोळे बरे झाले. परंतु दासी होण्याच्या भीतीमुळे तिने हे मानून घेण्यास नकार दिला. चिकित्सकाला माहित होते की ही स्त्री खोटं बोलत आहे. त्यांनी त्या स्त्रीला अद्दल शिकवण्यासाठी आणि तिचा सूड घेण्यासाठी चक्षुपालाने तिला एक औषध दिले, त्यामुळे ती स्त्री पुन्हा आंधळी झाली. तिने त्या चिकित्सकांची खूप गयावया केली ती फार रडली तरी त्या चिकित्सकाला तिच्यावर काहीच दया आली नाही. त्यांनी हे पाप केलं त्या परिणामी त्या चिकित्सकाला म्हणजे चक्षुपालाला पुढील जन्मी अंधत्व आले.

अन्न खाल्ल्याने केवळ शरीरच नाही तर मूडही चांगला राहतो. सहसा लोक नाश्ता, दुपारचे जेवण, हलका नाश्ता आणि संध्याकाळी रात्रीचे जेवण करतात. जरी असे काही लोक आहेत ज्यांना इतकी भूक लागते की ते दिवसातून अनेक वेळा अन्न खातात. जेवल्यानंतर लगेच काहीतरी खाण्याची इच्छा तुम्हालाही जाणवते का? जर तुमच्यासोबत असे होत असेल तर ते गांभीर्याने घ्या आणि ताबडतोब डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करून घ्या. कारण जास्त भूक लागणे हे कोणत्याही आजाराचे प्रारंभिक लक्षण असू शकते.

तुम्हाला जास्त भूक का वाटते?

- **पहिले कारण:** जर तुम्ही भारी शारीरिक काम केले तर तुम्हाला वेळोवेळी भूक लागू शकते. पण जर तुम्ही कोणतेही शारीरिक काम करत नसाल, तरीही तुम्हाला वारंवार भूक लागत असेल तर ही चिंतेची बाब आहे. जास्त भूक लागण्यामागे मधुमेह हे देखील एक कारण आहे. मधुमेही रुग्णांमध्ये अनेकदा असे दिसून येते की अन्न खाल्ल्यानंतरही त्यांना लवकर भूक लागते. कारण त्यांच्या शरीरात पुरेसे इन्सुलिन तयार होत नाही. मधुमेह हा असाध्य आजार असू शकतो, पण तो योग्य पद्धतीने खाल्ल्यास या आजारावर नियंत्रण मिळवणे सोपे जाते.
- **दुसरे कारण:** थायरॉईडचा त्रास होऊनही तुम्हाला जास्त भूक लागते. थायरॉईडमध्ये भूक लागते, तसेच वजनही झपाट्याने वाढू लागते. काही लोकांच्या चेहऱ्यावर केसही दिसू लागतात.
- **तिसरे कारण:** आजकाल मोठ्या संख्येने लोक नैराश्य आणि तणावाचा सामना करत आहेत. जास्त भूक लागण्याची समस्या तणाव आणि नैराश्यातही दिसून येते. भुकेमुळे अनेक वेळा लोक नकळत गरजेपेक्षा जास्त अन्न खातात, त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागतो आणि वजन वाढण्याचाही धोका असतो.

पण जर तुम्ही कोणतेही शारीरिक काम करत नसाल, तरीही तुम्हाला वारंवार भूक लागत असेल तर ही चिंतेची बाब आहे. जास्त भूक लागण्यामागे मधुमेह हे देखील एक कारण आहे. मधुमेही रुग्णांमध्ये अनेकदा असे दिसून येते की अन्न खाल्ल्यानंतरही त्यांना लवकर भूक लागते. कारण त्यांच्या शरीरात पुरेसे इन्सुलिन तयार होत नाही. मधुमेह हा असाध्य आजार असू शकतो, पण तो योग्य पद्धतीने खाल्ल्यास या आजारावर नियंत्रण मिळवणे सोपे जाते.

तुम्हालाही दिवसभर भूक लागते का? आजारांचा असू शकतो धोका



कंबर व पाठदुखीवर १० पदार्थ देतील झटपट आराम

अलीकडे १० पैकी ९ लोकांचे आरोग्य हे बैठ्या जीवनशैलीमुळे बिघडलेले असते. एकाच खुर्चीवर कित्येक तास बसून काम करताना फक्त मानसिकच नव्हे तर शारीरिक ताण सुद्धा वाढत असतो. व्यायाम नसल्याने साहजिकच शरीरातील काही भागांना विशेषतः सांध्यांना मुबलक प्रमाणात पोषक सत्वांचा पुरवठा होत नाही. त्याशिवाय हाडांना सांधून ठेवणाऱ्या मांसपेशींना सुद्धा या सवयी दुर्बल करत असतात. अशावेळी तुम्ही एखादी चुकीची किंवा अचानक केलेली हालचाल सुद्धा असहाय्य वेदनांना कारण ठरू शकते.

१) **दूध:** शरीराची बहुतांश दुखणी ही कॅल्शियमच्या कमतरतेमुळे उद्भवलेली असतात. दूध हे कॅल्शियमचे समृद्ध स्त्रोत मानले जाते त्यामुळे तुम्ही दिवसातून एकदा जरी दूध पिण्याची सवय लावली तरी तुम्हाला याचा प्रभाव तुमच्या शरीराच्या बांधणीवर व लवचिकतेवर पाहायला मिळू शकतो.

२) **कोबी:** कोणत्याही रूपात कोबी खाल्ल्याने आपल्याला व्हिटॅमिन अ,उ, ड यांचा मुबलक पुरवठा शरीराला देता येतो. कच्चा कोबी खाणे कधीही उत्तम. यातील दाहविरोधी गुणधर्मांमुळे आपल्याला सांधेदुखी कमी करण्यात मदत होऊ शकते.

३) **सुकामेवा:** काजू, बदाम, अक्रोड यामध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिडमुळे सांधेदुखी कमी होण्यास व हाडे मजबूत होण्यास मदत मिळू शकते.

४) **ब्रोकोली:** ब्रोकोली मध्ये सुद्धा अँटी इन्फ्लेमेंटरी सत्वांचा साठा असतो, यामुळे कार्टिलेजचे होणारे नुकसान टाळण्यास मदत होऊ शकते, या प्रभावाने कंबर दुखी व पाठदुखीला सुद्धा दूर करता येऊ शकते.

५) **कडधान्य:** कडधान्यांमधील अँटी इन्फ्लेमेंटरी गुणांमुळे तुम्हाला पाठदुखी दुर करता येऊ शकते. शिवाय जर तुम्हाला व्हीसीहेशतः पाठ किंवा कंबरेला दुखापत झाली असेल तर या ठिकाणच्या मांसपेशींचे नुकसान भरून काढण्यासाठी सुद्धा कडधान्यांची मोठी मदत होऊ शकते.

६) **मासे, (पडवे):** माशांमध्ये मुळातच ओमेगा ३ फॅटी ॲसिड व तेलाची मूल्ये अधिक असतात यामुळे मांसपेशींना वंगण मिळू शकते ज्यामुळे आओपापच हाडांची लवचिकता वाढून आपल्याला विना पाठदुखी हालचाल करता येते.

७) **ऑलिव्ह ऑइल:** दाह व युरिक ॲसिडचे प्रमाण कमी करण्यासाठी ऑलिव्ह ऑइल हा नियमित तेलासाठी उत्तम पर्याय ठरतो. आपण कमी प्रमाणात का होईना ऑलिव्ह ऑइलचे सेवन करण्याचा विचार करू शकता, यामुळे हाडांना झालेल्या दुखापतीतूनही लवकर बरं होण्यास मदत मिळते.

८) **रासबेरी:** सफरचंद, अननस, बेरी, चेरी, द्राक्षे आणि लिंबूवर्गीय फळांमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि ॲंटिऑक्सिडंट असतात जे गुडघे आणि पाठदुखीमुळे होणारी जळजळ कमी करण्यास मदत करतात.

९) संपूर्ण धान्य जसे गहू, तपकिरी तांदूळ, बाजरी, बार्ली, इत्यादी, पाठदुखीपासून मुक्त होण्यासाठी सर्वोत्तम पर्याय ठरतात. यामध्ये खनिजे आणि जीवनसत्त्वे यासह महत्त्वपूर्ण पोषक सत्व असतात. महत्त्वाचे म्हणजे, फायबरमुळे शरीरात शॉर्ट-चेन फॅटीॲसिड तयार होऊन जळजळ कमी करण्यास मदत होते.

१०) जेव्हा एखाद्या व्यक्तीला वेदना होतात, तेव्हा वेदनांमुळे त्यांचे स्नायू घट्ट होत असतात अशावेळी मॅग्नेशियम समृद्ध अन्न स्नायूंना मोकळे करते. म्हणूनच केळी, पालक अशा गोष्टींचा आहारात समावेश करायला हवा.

कथा/ बोधकथा

आकाशात किती तारे असतील

राजवाड्याच्या गच्चीवर बसून एके रात्री बादशहा व बिरबल गप्पा मारत होते. तेवढ्यात बादशहा बिरबलला म्हणाला, "बिरबल, या आकाशात किती तारे असतील बरे?" यावर बिरबलने जवळच उभ्या असलेल्या एका सेवकाला एक परातभर मोहऱ्या घेऊन येण्याचा हुकूम केला. सेवक जाताच आकाशाकडे पाहत बिरबल आपण जसे काही तारेच मोजीत आहेत, असे नाटक करू लागला. थोड्या वेळाने मोहऱ्या भरलेली परात आणून ती सेवकाने बिरबलाच्या पुढे ठेवली. मग तारे मोजण्याचे नाटक बंद करून ती परात बादशहापुढे ठेवीत तो म्हणाला, "खाविंद, जेवढ्या मोहऱ्या या परातीत आहते, बरोबर तेवढेच तारे या आकाशात आहेत. नेमके तारे किती आहेत, हे माहिती करून घ्यायचे असेल, तर या परातीतील एकेक मोहरी मोजीत, अशा सर्व परातभर मोहऱ्या मोजीत बसा, म्हणजे तुम्हाला ताऱ्यांची संख्या समजेल." यावर बादशहा म्हणाला, "बिरबल, त्याची काहीच गरज नाही. केवळ या मोहऱ्या मोजीत मला माझे उरलेले आयुष्य खर्च करायचे नाही."



सावधान! तुम्हीही डिस्पोजेबल कपमध्ये चहा, कॉफी पित असाल तर वेळीच सावध व्हा

पाणी, चहा, कॉफी किंवा इतर कोणत्याही पेयासाठी डिस्पोजेबल कपचा वापर अगदी सहज केला जातो. पण तुम्हाला माहित आहे का की डिस्पोजेबल कप आरोग्यावर परिणाम करू शकतात. याच्या अति सेवनाने कोणता धोका होऊ शकतो? या संदर्भात अधिक माहिती जाणून घेऊयात. प्लास्टिक आणि रसायनांचा वापर करून डिस्पोजेबल कप तयार केले जातात, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. जर तुम्ही दीर्घकाळ या कपचा वापर करत असाल तर कर्करोग होऊ शकतो. डॉक्टरांनी सांगितले की, डिस्पोजेबल कपमध्ये बिस्फेनॉल आणि बीपीए सारखी रसायने आढळतात. ही अत्यंत घातक रसायने आहेत. या कपमध्ये चहा किंवा गरम पाणी प्यायल्यास त्यातील रसायने त्यामध्ये विरघळतात आणि ही रसायने पोटात पोहोचतात, ज्यामुळे कर्करोगाचा धोका होऊ शकतो.



डिस्पोजेबल कपमुळे थायरॉईड आजाराचा धोका – डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, डिस्पोजेबल कप बनवण्यासाठी केवळ रसायनांचा वापर केला जात नाही, तर मायक्रोप्लास्टिकचाही वापर केला जातो. त्यामुळे थायरॉईडसारखे धोकादायक आजार होऊ शकतात. त्यांचा दीर्घकाळ वापर केल्याने देखील कर्करोग होऊ शकतो. अल्कोहोल किंवा धूम्रपान करणाऱ्यांमध्ये डिस्पोजेबल कप वापरल्याने कर्करोगाचा धोका खूप लवकर वाढू शकतो. म्हणूनच डिस्पोजेबल कपचा वापर टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

डिस्पोजेबल कपसाठी पर्याय – चहा, कॉफी किंवा पाणी पिण्यासाठी प्लास्टिक किंवा कागदाचा वापर टाळावा, असे डॉक्टर सांगतात. याऐवजी स्टीलचे भांडे किंवा कुल्हडचा कप वापरावे. कुल्हडच्या कपात चहा पिण्याचे अनेक फायदे आहेत. त्यामुळे कागद आणि प्लास्टिकचा वापरही कमी होतो. मातीच्या कुल्हडमध्ये असे अनेक घटक आढळतात, जे हाडांसाठी फायदेशीर असतात. म्हणूनच डिस्पोजेबल कपऐवजी तुम्ही कुल्हड किंवा स्टीलचे भांडे वापरू शकता.

वर्ष २०३०-३१ पर्यंत नवीन फार्मसी अभ्यासक्रमांना स्थगिती

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्यातील औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) संस्थांची वाढती संख्या आणि त्या तुलनेत गुणवत्तेचा प्रश्न विचारात घेता, राज्य सरकारने एक मोठा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. शैक्षणिक वर्ष २०३०-३१ पर्यंत राज्यात नवीन 'बी.फार्म' आणि 'डी.फार्म' महाविद्यालयांना परवानगी दिली जाणार नाही. मात्र, दुसरीकडे आदिवासी आणि डोंगराळ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाची दरी सांधण्यासाठी १७ नवीन व्यावसायिक महाविद्यालये सुरू करण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे.

मंत्रालयात गुरुवारी आयोजित 'महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग' (माहेड) च्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यात सध्या फार्मसी महाविद्यालयांचा पूर आला असून, अनेक ठिकाणी पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे चित्र आहे. हे लक्षात घेऊन २०२७-२८ ते २०३०-३१ या कालावधीत नवीन संस्थांना बंदी घालण्यासोबतच विद्यमान महाविद्यालयांमधील प्रवेशक्षमता वाढविण्यासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी मनाई केली आहे. या निर्णयाची अधिकृत माहिती केंद्र सरकार आणि 'फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया'ला



कळविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

दुर्गम जिल्ह्यांसाठी 'बृहत आराखडा' मंजूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा (लोणेरे) २०२५ ते २०३१ या कालावधीचा बृहत आराखडा बैठकीत मंजूर करण्यात आला. या आराखड्यानुसार गडचिरोली, नंदुरबार, हिंगोली, वाशिम, धाराशिव, सिंधुदुर्ग आणि परभणी या सात मागास व डोंगराळ जिल्ह्यांमध्ये अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी आणि 'बी.व्होक' यांसारखे व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणारी १७ नवीन महाविद्यालये प्राधान्याने सुरू केली जाणार आहेत.

शिक्षणातून 'टॅलेंट कॅपिटल' निर्मिती

उच्च शिक्षणात केवळ पदव्या देण्यापेक्षा विद्यार्थ्यांना उद्योगस्नेही कौशल्ये देणे आवश्यक आहे. 'ह्यूमन कॅपिटल'कडून 'टॅलेंट कॅपिटल'कडे जाण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. या बैठकीत 'रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठा'चा बृहत आराखडाही मंजूर करण्यात आला. नव्या धोरणानुसार पारंपरिक महाविद्यालयांमध्ये आता 'समाजकार्य' ही स्वतंत्र विद्याशाखा सुरू करून बहुविद्याशाखीय शिक्षणाला वाव दिला जाणार आहे.

सिंधुदुर्गमध्ये 'हॉटेल मॅनेजमेंट'ला मान्यता

सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटन जिल्हा म्हणून होणारा विस्तार लक्षात घेऊन, राज्य सरकारने येथे रोजगाराभिमुख शिक्षणावर भर दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या (लोणेरे) नवीन बृहत आराखड्यानुसार, सिंधुदुर्ग आणि नंदुरबार जिल्ह्यांत 'हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी' अभ्यासक्रमाची नवीन महाविद्यालये सुरू करण्यास प्राधान्याने मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील तरुणांना स्थानिक पातळीवरच जागतिक दर्जाचे आदरातिथ्य क्षेत्रातील शिक्षण उपलब्ध होणार असून, पर्यटन उद्योगासाठी लागणारे कुशल मनुष्यबळ जिल्ह्यातच तयार होण्यास मदत होईल.

दुधाच्या किंमती वाढणार



■मुंबई। प्रतिनिधी,

देशातील दुध क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असलेल्या गुजरात को-ऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशनने अमूल ब्रँड अंतर्गत विक्री होर्णाया दुधाच्या किमतीत देशभरात प्रति लिटर २ रुपयांची वाढ करण्याची घोषणा केली आहे. ही दरवाढ गुरुवारपासून, म्हणजेच १४ मे २०२६ पासून लागू होणार आहे.अमूलने दिलेल्या अधिकृत पत्रकानुसार, ताज्या दुधाच्या पिशव्यांमधील सर्व प्रमुख प्रकारांमध्ये जसे की, अमूल ताजा, अमूल गोल्ड, अमूल शक्ती ही वाढ करण्यात आली आहे. फेडरेशनने स्पष्ट केले आहे की, ही दरवाढ साधारणपणे २.५ ते ३.५ टक्क्यांच्या दरम्यान आहे. याआधी अमूलने १ मे २०२५ रोजी दुधाचे दर वाढवले होते. उत्पादनावरील वाढता खर्च हे मुख्य कारण असल्याचे जीसीएमएमएफने म्हटले आहे. गेल्या वर्षभरात अनेक बाबी महागल्याने ही दरवाढ अनिवार्य झाली होती. जनावरांच्या खाद्याच्या दरात लक्षणीय वाढ झाल्याने दुग्धोत्पादन खर्च वाढला आहे. दूध भरण्यासाठी वापरल्या जार्णाया प्लास्टिक फिल्मच्या किमतीतही वाढ झाली आहे. इंधनाचे दर वाढल्यामुळे दुधाच्या वाहतुकीचा खर्च वाढला.त्याचा परिणाम दरांवर झाल्याचे समोर आले आहे.

उन्हाच्या चटक्याने जिल्हा होरपळला; पाणीटंचाईने ग्रामीण भागात भीषण परिस्थिती

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे जिल्ह्यात उन्हाचा चटका दिवसेंदिवस वाढत असून शहर व ग्रामीण भागात उष्णतेच्या लाटेने नागरिक अक्षरशः होरपळून निघत आहेत. तापमानाने कमाल पातळी गाठली असताना ग्रामीण भागात झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे घामाच्या धारांनी त्रस्त झालेल्या नागरिकांना तात्पुरता गारवा अनुभवायला मिळाला. पर्जन्यराजाचे आगमन अद्याप दूर असले तरी अवकाळी सरींनी त्याची चाहूल दिल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या उन्हाळ्यात आतापर्यंतचे तापमानाचे सर्व विक्रम मोडले असून पुढील काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. एकीकडे उष्णतेची तीव्रता वाढत असताना ग्रामीण भागात पाणीटंचाईने गंभीर स्वरूप धारण केले आहे. विशेषतः मुरबाड आणि शहापूर तालुके सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. विहिरी, बोअरवेल आणि स्थानिक जलस्त्रोत कोरडे पडू लागले आहेत. काही ठिकाणी विहिरींमध्ये साचलेले गढूळ पाणी प्यायल्यामुळे कावीळ, अतिसार यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात पाणी अडवा, पाणी जिरवा या धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याची आवश्यकता असून त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. त्यामुळे दरवर्षी पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होत आहे. धरणातील पाणीसाठ्यावर परिणाम बारवी धरण आणि टाटा समूहच्या आंध्रा धरणातील पाण्याचे उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत असून पाणीसाठा कमी होत आहे. याचा परिणाम जिल्ह्यातील महापालिका व नगरपालिकांवर होणार आहे. लघुपाटबंधारे विभागाने १४ मेनंतर मोठ्या प्रमाणात पाणी कपातीचे संकेत दिले असून मे अखेरपर्यंत तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तवली आहे. शहरांवरही परिणामाची शक्यता ठाणे शहरातील घोडबंदर परिसर, कळवा, मुंब्रा तसेच कल्याण-डोंबिवली परिसरातील २७ गावे, भिवंडी, मीरा-भाईंदर आणि बदलापूर-अंबरनाथ भागातही पाणी कपातीचा फटका बसण्याची शक्यता आहे.



टँकरवर अवलंबून पाणीपुरवठा

जिल्हा प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात आला असला तरी डोंगराळ भागातील नागरिकांना पाण्यासाठी अनेक किलोमीटर पायपीट करावी लागत आहे . सुमारे २७ गावे आणि १०३ पाड्यांमध्ये राहणाऱ्या ४२ हजार २७३ कुटुंबांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे आहे . ग्रामीण भागातील नागरिकांना रोजच्या जगण्याचा संघर्ष करावा लागत असून पिण्याचे पाणी डोळ्यातील अश्रूंहूनही महाग झाले आहे, अशी स्थिती निर्माण झाली आहे . मुक्या जनावरांसाठीही पाणी व चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे .

मिरा- भाईंदरमध्ये अग्निशमन कर्मचार्यांची जनगणनेसाठी नियुक्ती

■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरा-भाईंदर शहरात कडक उन्हाळा असल्याने गेल्या काही दिवसांपासून आगीच्या घटना वाढत आहेत. कंत्राटी मजूर व वाहन चालक यांच्या भरवश्यावर अग्निशमनाचे काम सुरू असताना आता अग्निशमन दलातील जवानांना जनगणनेच्या कामासाठी नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मिरा- भाईंदर शहरात उन्हाचा पारा वाढल्यापासून म्हणजेच मार्च महिन्यापासून आगीच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. एकाच दिवसात दोन झ तीन आगीच्या घटना घडत आहेत. त्यात तीन जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाला होता. त्यातच शॉर्टसर्किट, प्लास्टिक शेड व भंगार गोडाऊन इतर कारणांमुळे आगीच्या घटना घडत आहेत. या आगीच्या घटनांमध्ये नागरिकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी उपलब्ध जवान कमी असल्याने मोठा ताण येताना पाहायला मिळत आहे. एका ठिकाणी आगीवर नियंत्रण मिळवल्यानंतर जवानांना दुसर्या ठिकाणी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. त्यातच काही ठिकाणी रस्ते अरुंद किंवा वाटेत डेब्रिज व मातीचा भराव असल्याने वाहनाना त्याठिकाणी जाण्यास उशीर होत असतो. असे चित्र असताना आता महापालिका प्रशासनाकडून विविध विभागातील कर्मचार्यांप्रमाणेच अग्निशमन दलातील जवानांवर देखील जनगणना करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यासाठी मंगळवार ते गुरुवारपर्यंत दोन दिवस कर्मचार्यांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्याच दिवशी म्हणजे मंगळवारी कार्यरत पैकी सुमारे ५० जवान प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. शहराची लोकसंख्या वाढली आहे, तरीही महापालिकेकडे केवळ १५० जवान असून प्रत्येक पाळीला ५० जवान उपलब्ध करून दिले जातात. ही बाब लक्षात घेता कार्यरत असलेल्यापैकी अधिक तर जवान प्रशिक्षणाला उपस्थित होते. त्यामुळे दिवसभर विविध अग्निशमन केंद्र ओसाड पाहायला मिळाली.



पास विद्यार्थांपेक्षा जागा अधिक; अकरावीसाठी मुंबईत ४ लाख ७६ हजार जागा, ठाण्यात १ लाख ६० हजार जागा

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई विभागात अकरावी प्रवेशासाठी यंदा ४ लाख ७६ हजार जागा २५० जागा उपलब्ध आहेत. यामध्ये ठाणे जिल्ह्यात १ लाख ६० हजार ८४० जागांचा समावेश आहे. यंदा उपलब्ध जागांच्या तुलनेत कमी विद्यार्थी दहावी परीक्षेत पास झाले असल्याने यंदाही अकरावीच्या अनेक जागा रिक्त राहण्याची शक्यता आहे.

पास विद्यार्थांपेक्षा जागा अधिक; अकरावीसाठी मुंबईत ४ लाख ७६ हजार जागा, ठाण्यात १ लाख ६० हजार जागा उपलब्ध पास विद्यार्थांपेक्षा जागा अधिक; अकरावीसाठी मुंबईत ४ लाख ७६ हजार जागा, ठाण्यात १ लाख ६० हजार जागा उपलब्ध'एआय'ने बनविलेली .

शिक्षण संचालनालयाने दहावी निकालानंतर राज्यातील अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. मुंबई विभागात अकरावी प्रवेशासाठी यंदा ४ लाख ७६ हजार जागा २५० जागा उपलब्ध आहेत. यामध्ये



ठाणे जिल्ह्यात १ लाख ६० हजार ८४० जागांचा समावेश आहे. यंदा उपलब्ध जागांच्या तुलनेत कमी विद्यार्थी दहावी परीक्षेत पास झाले असल्याने यंदाही अकरावीच्या अनेक जागा रिक्त राहण्याची शक्यता आहे. दहावी परीक्षेत मुंबई विभागातून ३ लाख ७ हजार ४८० विद्यार्थी पास झाले आहेत. यातील बहुतांश विद्यार्थी अकरावीला प्रवेश घेणार आहेत. त्यामुळे अकरावी प्रवेशासाठी चांगले महाविद्यालय मिळावे, यासाठी विद्यार्थांमध्ये चुरस लागणार आहे. जागा जास्त शिल्लक राहत असल्यामुळे सर्वांना प्रवेश मिळणार आहे. मात्र, आवडीचे महाविद्यालय मिळावे, यासाठी पास झालेले विद्यार्थी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करणार आहेत. मुंबई शहरातून २४ हजार ४५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर पश्चिम उपनगरातून ४८ हजार ६६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. पूर्व उपनगरातून ३९ हजार २१२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ठाणे जिल्ह्यातून १ लाख १० हजार ९०४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी १ लाख ५ हजार ४०८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून या जिल्ह्याचा निकाल ९५.०४ टक्के लागला आहे. रायगड जिल्ह्यातून ३५ हजार २१७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ३३ हजार ४६९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून या जिल्ह्याच्या निकालाची टक्केवारी ९५.०३ टक्के आहे. पालघर जिल्ह्यातून ६० हजार ५५० विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ५६ हजर २६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या जिल्ह्याचा निकाल ९२.९२ टक्के लागला आहे.

अशा आहेत जागा

मुंबई विभागात अकरावी प्रवेशासाठी यंदा ४ लाख ७६ हजार जागा २५० जागा उपलब्ध आहेत. यामध्ये सर्वाधिक जागा मुंबई शहर आणि उपनगरात उपलब्ध आहेत. या दोन जिल्ह्यात १ लाख ९९ हजार ७० जागा उपलब्ध आहेत. त्याखालोखाल ठाणे जिल्ह्यात ठाणे जिल्ह्यात १ लाख ६० हजार ८४० जागांचा समावेश आहे तर पालघर जिल्ह्यात ६६ हजार ६२० आणि रायगड जिल्ह्यात ४९ हजार ७२० जागा उपलब्ध आहेत.

१५ गुन्ह्यांचा इतिहास असलेला दरोडेखोर पालघर पोलिसांच्या ताब्यात



■पालघर। प्रतिनिधी,

पालघर शहरातील देविशा रोड परिसरातील घरफोडी प्रकरणाचा पालघर पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास करत सराईत दरोडेखोराला अटक करण्यात मोठे यश मिळवले आहे. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीपर्यंत पोहोचत चोरीस गेलेल्या लाखो रुपयांच्या सोन्याच्या दागिन्यांसह चांदीचे शिक्के हस्तगत केले आहेत. विशेष म्हणजे अटक करण्यात आलेल्या आरोपीवर यापूर्वी मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर आणि वसई-विरार परिसरात चोरी व जबरी चोरीचे तब्बल १५ गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. १७ एप्रिल २०२६ रोजी रात्री ते १८ एप्रिल रोजी सकाळदरम्यान देविशा रोड येथील नंदाभुवन बिल्डिंगमधील भारती नितीनकुमार कर्णिक यांच्या घराचा दरवाजाचा कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला होता. चोरट्याने कपाटातील सुमारे १ लाख २० हजार रुपये किमतीचे ४५ ग्रॅम सोन्याचे दागिने, चांदीचे शिक्के व रोख रक्कम असा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी पालघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. फॅशन सल्ला सेवा या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व पालघर पोलीस ठाण्याची विशेष पथके तयार करण्यात आली. तपासादरम्यान इश्तीयाक मोबीन अन्सारी (वय ५९, रा. बनेलीगाव, टिटवाळा पूर्व) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडून ४४ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ४ चांदीचे शिक्के जप्त केले. सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश शिंदे, पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील सावंतदेसाई, पोलीस हवालदार संदीप सरदार, भगवान आव्हाड, राकेश पाटील तसेच पोलीस अंमलदार विशाल लोहार, विशाल कडव आणि महेश अवतार यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल मणिकेरी करत आहेत.

मुलाच्या आयुष्यात आई-वडील दोघेही महत्त्वाचे; उच्च न्यायालयाचा निवार्ळा; याचिकाकर्त्या महिलेला झटका

■मुंबई । प्रतिनिधी,

मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या आयुष्यात आई आणि वडील दोघांचीही उपस्थिती अत्यंत महत्त्वाची असते. दोन्ही पालकाचे स्थान तितकेच महत्त्वाचे आहे, असे स्पष्ट निरीक्षण नोंदवत उच्च न्यायालयाने मुलाच्या कोठडीच्या प्रकरणात याचिकाकर्त्या महिलेला झटका दिला. ६ वर्षांच्या मुलाच्या ताब्याशी संबंधित याचिकेवर न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या एकलपीठाने सुनावणी घेतली. यावेळी न्यायालयाने आईच्या हट्टी स्वभावावर तीव्र नाराजी व्यक्त करत स्पष्ट मत मांडले.



मुलाच्या पालकांचे अर्थात या प्रकरणातील पती-पत्नीचे २०१६ मध्ये लग्न झाले होते. २०२० मध्ये त्यांना मुलगा झाला. मात्र, कौटुंबिक वादानंतर मे २०२१ पासून दोघेही वेगळे राहत आहेत. मुलाचा ताबा सध्या आईकडे आहे. वडिलांनी मुलाला भेटण्याचा अधिकार मिळावा, यासाठी याचिका दाखल केली होती. त्यावर कौटुंबिक न्यायालयाने वडिलांच्या बाजूने निर्णय दिला होता.

आईची अतिमालकी हक्काची भावना घातक

आई आपल्या पतीबद्दलच्या रागामुळे मुलाला वडिलांपासून दूर ठेवत आहे. आईची ही अतिमालकी हक्काची भावना मुलाच्या मानसिक आरोग्यासाठी आणि विकासासाठी हानिकारक ठरू शकते. मुलाच्या मनात वडिलांबद्दल किंवा वडिलांच्या कुटुंबाबद्दल कोणत्याही प्रकारचा द्वेष किंवा नकारात्मकता निर्माण करण्याचा अधिकार आईला नाही, असेही मत न्यायालयाने नोंदवले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com